Estd. 1962

'A++' Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## प रि प त्र क

४८/२०२३

**विषय - विद्यापीठात परिसरामध्ये Triathlon/Duethlon/ Walkathon किंवा मॅरेथॉन या सारख्या स्पर्धा/ उपक्रम आयोजित करण्यास पूर्व परवानगी घेण्याबाबत**

सर्व संबधिताना कळविण्यात येते की, विद्यापीठ परिसरामध्ये विविध संघटना /सोसायटी /क्लब/असोसिएशन/संस्था Triathlon / Duethlon / Walkathon किंवा मॅरेथॉन या सारख्या अधिकृत स्पर्धा/उपक्रम आयोजित करण्यासाठी परवानगी मिळणेबाबत विनंती करतात. याबाबत संबधितानी दि. १०/११/२०२३ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या ठरावानुसार खालील प्रमाणे कार्यवाही करावी.

१) संबधित संघटना /सोसायटी /क्लब/असोसिएशन/संस्था यांनी नियोजित कार्यक्रमाच्या किमान १५ दिवस अगोदर पूर्व परवानगीसाठी मा. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे नावे अर्ज करावा.

२) संबधित संघटना /सोसायटी /क्लब /असोसिएशन/संस्था यांचा अर्ज प्राप्त झालेनंतर नियोजित कार्यक्रमांची दिनांक, वेळ, ठिकाण व इतर प्रशासकीय बाबी तपासून खालील अटीस अधीन राहून परवानगी देण्यात येईल.

३) उपरोक्त नमूद स्पर्धा/उपक्रमाच्या परवानगीसाठी रु.१०,०००/- व सदर रक्कमेवर १८ टक्के जी.एस.टी. **रु.१८००/- अशी एकुण रु.११,८००/-** रक्कम A.1.R.24.1 Other Receipts (GST-other than Uty.) मध्ये जमा करावी.

४) उपरोक्त नमूद स्पर्धा/उपक्रमाच्या अनुषंगाने स्वच्छता शुल्क डिपॉझिट रु.५०००/- ही रक्कम E.2.R.6 ( Security Deposit ) या अंदाजपत्रकीय शिर्षकामध्ये जमा करावी.

५) उपरोक्त नमूद स्पर्धा/उपक्रमावेळी विद्यापीठाच्या मालमत्तेस कोणत्याही प्रकारची हानी पोहचणार नाही याची दक्षता घ्यावी.

६) उपरोक्त नमूद स्पर्धा/उपक्रमावेळी विद्यापीठातील शैक्षणिक वातावरणास बाधा येणार नाही याची दक्षता घ्यावी.

७) शिवाजी विद्यापीठ ही शैक्षणिक संस्था असल्याने कोणतेही राजकीय अथवा संघटनात्मक भाष्य करु नये.

८) उपरोक्त नमूद स्पर्धा/उपक्रम झालेनंतर सुरक्षा विभाग व अभियांत्रिकी विभाग यांचे ना-हरकत शेरा प्राप्त झालेनंतर सुरक्षा रक्कम (स्वच्छता शुल्क डिपॉझिट) परत करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

९) उपरोक्त नमूद स्पर्धा/उपक्रम झालेनंतर सदर परिसर स्वच्छ ठेवणे.

**कुलसचिव**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

**जा.क्र. आस्थापना/** 2114
**दि.** 16 DEC 2023
**प्रति,**

१) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, व सेवक
२) मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.
३) जनसंपर्क कक्ष - माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी
४) इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेस्थळावर प्रसिध्द करावे.
- यांना माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी